महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 22 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 264 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आग्रा येथे शिवाजी महाराजांचं भव्य स्मारक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणा शिवजयंती दिनी केली होती. अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यातही आग्र्यातील भव्य स्मारकाची तरतूद करण्यात आल्याचे दिसून आले. आता, आग्र्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. आता, या स्मारकाच्या उभारणीसाठी कार्यान्वयीन व निधीची जबाबदारी राज्याच्या पर्यटन विभागाकडे देण्यात आली असून याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे भव्य स्मारकाच्या उभारणीस येत्या काळात गती लाभणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यातील ज्या ठिकाणी कैद राहिलेले ती जागा महाराष्ट्र सरकार उत्तर प्रदेश सरकारकडून अधिग्रहित करणार आहे. या जागेवर शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारले जाणार असून आग्र्यातील

## शासनाचा जीआर निघाला

\- - - -

## पर्यटन विभागाकडे असणार जबाबदारी

शिवरायांची गाथा सांगणारे संग्रहालयही याठिकाणी उभारण्यात येणार आहे. राज्य सरकारच्या पर्यटन विभागाकडून स्मारकासाठी आर्थिक तरतूद केली जाणार आहे.

स्मारक उभारणीसाठी पर्यटन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास तज्ज्ञ तसेच जाणकार, तज्ज्ञांची समिती स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण व अनुषंगिक बाबींकरिता पर्यटन विभागाला जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांची



आग्र्यातून सुटका आणि महाराजांच्या पराक्रमाच्या गौरवगाथेचे स्मरण पुढील पिढ्यांसाठी करून देण्यासाठी हे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

### शिवरायांची गाथा सांगणारे संग्रहालय

आग्रा येथील ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, ती जागा-वास्तू महाराष्ट्र शासन या प्रकल्पात अधिग्रहीत करणार आहे. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक निर्माण करण्यात येणार आहे. या शौर्य स्मारकामध्ये महाराजांचा जाज्वल्य इतिहास मांडला जाणार आहे. त्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे उपक्रम संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम, माहितीपट आदी राबविण्यात येणार आहेत.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांना मावळयासह मुघलशाहीने कपटाने नजरकैदेत ठेवले होते. परंतु आपल्या चातुर्याने आणि पराक्रमाने महाराजांनी नजरकैदेतून स्वतःसह शंभुराजे आणि सर्व मावळयांची सुटका करून घेतली. या ऐतिहासिक आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असलेल्या घटनेबाबात मराठीच नव्हे तर इतिहासप्रेमी पर्यटकांत औत्सुक्य असते. आग्रा येथे ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत राहीले त्या ठिकाणी आवर्जून जाण्याचा प्रयत्न पर्यटक करतात, मात्र, या ठिकाणी कोणतीही ऐतिहासिक बाब, स्मारक, संग्रहालय नसल्याने या पर्यटकांपर्यंत हा जाज्वल्य इतिहास पोहचत नाही. महाराष्ट्राच्या बाहेर अशाप्रकारचा अत्यंत दुर्मिळ असा केलेला पराक्रम ही इतिहासातील अत्यंत महनीय आणि अभ्यासपूर्ण बाब आहे. अशा स्थळासाठी आणि त्या दैदिप्यमान इतिहासाचे उदात्तीकरण आणि तो वारसा पुढच्या पिढ्यांकडे कायम रहावा, त्या स्थळांची, त्या वारशांची जतन, सवंर्धन आणि विकास करण्याकरिता शासनाने इतर राज्यातील अशी स्थळे सुध्दा विकसित करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

## थोडक्यात महत्वाचे

### राज्यातील उत्तम कार्यामुळे वन खात्याचा सन्मान वाढेल -वन मंत्री गणेश नाईक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे दि. 21:-** राज्याचे वनखाते अतिशय उत्कृष्ट काम करीत असून त्यामुळे सबंध भारतामध्ये वनखात्याचा सन्मान वाढेल, असे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी आज वाशी येथे आयोजित वन विभागाच्या पदक वितरण सोहळ्यामध्ये केले. यावेळी महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल) श्रीमती शोमिता बिस्वास, एम श्रीनिवास रेड्डी, एम श्रीनिवास राव, संजय गौर, विवेक खांडेकर, ऋषिकेश राजन, एस व्ही रामराव,के प्रदीपा, एन.आर प्रवीण आदी मान्यवर उपस्थित होते.

वन मंत्री गणेश नाईक पुढे म्हणाले की, 100 दिवस कृती आराखड्यामध्ये ठरविल्याप्रमाणे वन खात्याने वनांची वाढ करण्याचे इष्टांक पूर्ण केले आहे, ही अभिमानाची बाब आहे. वने ही राज्याची संपत्ती आहे. त्याचे आपण जतन केले पाहिजे. आपण सर्व एक कुटुंब आहोत. आपल्या कर्तव्याला अनुसरून आपण सर्वांनी जोमाने काम केले पाहिजे. आजचा हा पुरस्कार सोहळा आपल्या सर्वांना आत्मविश्वास देणारा आहे. आपल्या शौर्याचा सन्मान करणारा आहे. या पुरस्कारामुळे काम करणाऱ्या सर्वांना प्रेरणा मिळणार आहे. ते म्हणाले की, या सर्वांनी आपल्या कर्तव्याशी जागून आपल्या जीवाची पर्वा न करता कार्य केले आहे. त्यांचा हा सन्मान आहे. 21 मार्च जागतिक वन दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वनांचे रोपण केले पाहिजे, त्यांचे संगोपन केले पाहिजे. यावेळी त्यांनी सांगितले की, वन विभागातील रिक्त पदांचा आढावा घेवून लवकरच नवीन लोकांची भरती करण्यात येणार आहे. वन खात्याला ज्या ज्या बाबींची गरज आहे त्या सर्व बाबी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन व ॲपचे अनावरण करण्यात आले . महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी आपल्या मनोगतामध्ये वनखात्याचे कामकाज कशा प्रकारे चालते याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल) प्रमुख शोमिता बिस्वास यांनी केले. यावेळी त्यांनी जागतिक वनदिवस व पुरस्कार सोहळयाची माहिती दिली. जागतिक वन दिनानिमित्त वनविभागाच्या पदक वितरण सोहळ्यामध्ये जागतिक वन दिनानिमित्त वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते वनविभागाचा पदक वितरण सोहळा ऑडिटोरियम, सिडको कन्वेंशन सेंटर, सेक्टर-30, वाशी, नवी मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र वन विभागातील वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल तसेच वन सेवेतील काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांना सन 2020-21, सन 2021-22 व सन 2022-23 वर्षाचे पदक वितरण करण्यात आले.

# ठाण्यातील गावांचा महापालिकेत समावेश

# जिल्हा परिषदेच्या महसुली उत्पन्नात घट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषदेच्या यंदाच्या अर्थसंकल्पात गेल्यावर्षीच्या तुलनेत मुद्रांक शुल्क अनुदान, पाणी पट्टी उपकर यासह इतर अशा महसुली उत्पन्नामध्ये २६ कोटींनी कमी अपेक्षित धरण्यात आले आहे. जिल्हा परिषद क्षेत्रातील गावे कल्याण-डोंबिवली तसेच नवी मुंबई पालिका क्षेत्रात समाविष्ट करण्यात आली असून या गावांमधूनच मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेला महसूल मिळत होता. मात्र, पालिका क्षेत्रात ही गावे गेल्याने जिल्हा परिषदेला आर्थिक फटका बसणार आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पातील महसुली उत्पन्नात घट अपेक्षित धरण्यात आली आहे.

ठाणे जिल्हा परिषदेचा २०२५-२६ या वर्षाकरीता १०८.९३ कोटी रुपयाचा अर्थसंकल्प मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मंगळवारी बी. जे. हायस्कूल येथील सभागृहात सादर केला. गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात मुद्रांक शुल्क अनुदानापोटी ८८ कोटी ६० लाखाचे उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. त्यापैकी वर्षाअखेरपर्यंत ८८ कोटी ८९ लाख रुपयांचा महसुल मिळेल, असा जिल्हा परिषदेला अंदाज आहे. असे असले तरी यंदाच्या मुद्रांक शुल्क अनुदानापोटी ७२ कोटी ६१ लाख रुपयांचे महसुली उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. तसेच गेल्यावर्षी पाणी पट्टी उपकरापोटी १० कोटीचे उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले असले तरी १७ कोटी रुपयांचा महसुल मार्च अखेरपर्यंत जमा होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तरीही यंदाच्या वर्षी पाणी पट्टी उपकरापोटी १० कोटीचे उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. अशाचप्रकारे गेल्यावर्षीच्या तुलनेत एकूण महसुली उत्पन्न २६ कोटी रुपयांनी कमी धरण्यात आले आहे. पालिका क्षेत्रात ही गावे गेल्याने जिल्हा परिषदेचा महसुल आर्थिक फटका बसत असून यामुळेच गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदाची उत्पन्न वसुली कमी धरण्यात आली आहे.



> महसुली उत्पन्न मिळत असलेली काही गावे पालिका क्षेत्रांमध्ये समाविष्ट झाली आहेत. त्यामुळे महसुली उत्पन्न काही प्रमाणात कमी होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. परंतु गावांचा विकास करण्यासाठी शासन काही महत्वाचे निर्णय घेत असतात, त्याचाच एक भाग म्हणून ही गावे पालिका क्षेत्रात समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यावर बोलणे अधिक उचीत होणार नाही.
>
> \- रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद

**घेसर, हेदुटणे, उंब्रोली, भाल, द्वारली, मणेरे, वसार, आशेळ, नादिवली, आडिवली ढोकली, दावडी, चिंचपाडा, पिसवली, गोळीवली, सोनारपाडा, माणगाव, कोळे, निळजे, काटई, उसरघर, घारीवली, संदप, भोपर, नादिवली पंचानंद, आसदे, सागाव, देसलेपाडा, ही २७ गावे कल्याण-डोंबिवली पालिका क्षेत्रात तर, दहिसर, निगु, मोकाशी पाडा, नावळी, भांडर्ली, पिंपरी गाव, घोटेघर, बांबली, उत्तरशिव, नागाव, नारिवली, वाकळन, बाळे आणि दहिसर मोरी ही १४ गावे नवी मुंबई पालिका क्षेत्रात समाविष्ट करण्यात आली आहेत**

# महापालिका परिक्षेत्रातील अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेवू नयेत !

## - उपआयुक्त संजय जाधव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महापालिका क्षेत्रातील शासनाच्या परवानगी शिवाय सुरु असलेल्या प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात आली असून, या शाळांमध्ये आपल्या पाल्यांचे प्रवेश घेवू नयेत, असे आवाहन शिक्षण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी केले आहेत.

या शाळेतील विद्यार्थ्यांचे नजिकच्या शाळांमध्ये समायोजन करण्यात येणार आहे. तसेच संबंधित अनधिकृत शाळांविरुध्द दंडात्मक

### केडीएमसीकडून अनधिकृत शाळांची यादी जाहीर

कार्यवाही केली जाईल, अशी माहिती शिक्षण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी दिली.अनधिकृत प्राथमिक शाळांची यादी खालीलप्रमाणे

**१) एल.बी.एस. इंग्लिश स्कुल, बल्याणी टिटवाळा - इंग्रजी माध्यम.**

**२) सनराईज स्कुल, बल्याणी टिटवाळा - इंग्रजी माध्यम.**

**३) संकल्प इंग्लिश स्कुल, बल्याणी टिटवाळा - इंग्रजी माध्यम.**

**४) पूर्ण प्रज्ञा इंग्लिश स्कुल, बल्याणी टिटवाळा - इंग्रजी माध्यम.**

**५) पोलारिस कॉन्व्हेन्ट स्कुल, बल्याणी टिटवाळा - इंग्रजी माध्यम.**

**६) डी.बी.एस. इंग्लिश स्कुल, आंबिवली (पश्चिम) - इंग्रजी माध्यम.**

**७) ऑक्सफर्ड इंग्लिश स्कुल, आंबिवली (पश्चिम) - इंग्रजी माध्यम.**

**८) बुद्धीस्ट इंटरनॅशनल स्कुल, महाराष्ट्र नगर, डोंबिवली (पश्चिम)- इंग्रजी माध्यम.**

# वालधूनी नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी उल्हासनगर महापालिका सरसावली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** कधी काळी उल्हासनगर शहराच्या सौंदर्यात भर घालणारी, पण आता दुर्गंधी आणि कचऱ्याच्या विळख्यात अडकलेली वालधुनी नदी पुन्हा एकदा स्वच्छतेच्या दिशेने प्रवास सुरू करत आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्य स्वच्छता निरीक्षक विनोद केणे यांच्या उपस्थितीत नदी स्वच्छता अभियानाला नव्याने सुरुवात झाली असून, नदीच्या पुनरुज्जीवनासाठी हा मोठा टप्पा ठरणार आहे. शनिवारपासून सुरू झालेल्या या मोहिमेअंतर्गत वडोलगाव आणि अशोकनगर पासून उल्हासनगर स्टेशन पुलापर्यंत मोठ्या प्रमाणावर गाळ आणि कचरा काढण्याचे काम सुरू आहे. अत्याधुनिक जेसीबी आणि पोकलेन



मशीनच्या सहाय्याने नदीतील कचरा हटवला जात आहे, ज्यामुळे येत्या पावसाळयात पुराचा धोका कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या आठ वर्षांपासून उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने या मोहिमेचा सातत्याने पाठपुरावा केला असून, आतापर्यंत तब्बल ६,००० डंपर कचरा नदीतून बाहेर काढण्यात आला आहे.

ही स्वच्छता मोहिम उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील गौशाळा, वडोलगाव पुल आणि हिराघाट भागातही वेगाने सुरू आहे. नदीत साचलेला गाळ आणि निचऱ्याच्या समस्येमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी निर्माण होत होती. मात्र, या मोहिमेमुळे नदीतील केमिकल आणि दुर्गंधीत मोठी घट होण्याची शक्यता आहे.

शहराच्या स्वच्छतेसाठी काम करणाऱ्या वालधुनी नदी संवर्धन समितीने उल्हासनगर महापालिकेच्या या मोहिमेचे स्वागत केले आहे. या स्वच्छता मोहिमेचा थेट फायदा नदीकिनारी वसलेल्या वस्त्यांना होणार आहे. पावसाळयात अनेकदा नदी किनारी असलेल्या घरांमध्ये पाणी शिरते. मात्र, नदीतून कचरा आणि गाळ हटवल्याने पुराचा धोका कमी होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. नागरिकांनी नदीत कचरा टाकू नये आणि स्वच्छतेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# मुंबईकरांसाठी २३८ नवीन एसी लोकल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**लोकलने प्रवास करणाऱ्या मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी आहे. मुंबईचा लोकल प्रवास आता आणखी गारेगार आणि सुखकारक होणार आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने वातानुकूलित म्हणजेच एसी लोकल गाड्यांची संख्या वाढवण्याचा प्लान केला आहे. केंद्र सरकारने २३८ नवीन एसी लोकल गाड्यांच्या खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली.**



काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी संसदेमध्ये मुंबईच्या लोकल प्रवासाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले होते. वर्षा गायकवाड यांनी मुंबई लोकल प्रवासाचे वास्तव संसदेत सांगितले. यावेळी त्यांनी विरार-चर्चगेट आणि कल्याण - सीएसएमटी प्रवास करण्याचे आवाहन केले. त्याचसोबत लोकल प्रवासादरम्यान २४६८ जणांना आपला जीव गमवावा लागला आणि २६९७ जण जखमी झाले असल्याची माहिती देखील त्यांनी संसदेत सांगितली. वर्षा गायकवाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उत्तर देताना मुंबईत २३८ नव्या एसी लोकल लवकरच सुरू होणार असल्याची माहिती दिली.

मुंबईत पश्चिम आणि मध्य रेल्वे मार्गावर १०९ एसी लोकल धावतात. या गाड्या आठवड्याच्या दिवशी आणि आठवड्याच्या शेवटी ६५ सेवा चालवतात. तर उपनगरीय मार्गांवर अलीकडेच १३ नवीन एसी लोकल सेवांचा समावेश करण्यात आला आहे. हा विस्तार एकूण सेवा सुधारण्यासाठी आणि अधिक आरामदायी प्रवास पर्यायांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग आहे.

**केंद्रीय मंत्री अश्विन वैष्णव यांनी या संदर्भात सांगितलं की, मुंबईत सध्या 3500 लोकल सेवा सुरु आहेत. रेल्वेकडून येत्या काळात आणखी 300 लोकल सेवा सुरु होणार आहेत. त्यासाठी 17,107 कोटी रुपयांची गुंतवणूक रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांमध्ये 1.70 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. पश्चिम रेल्वे नेटवर्क अंतर्गत 25 डिसेंबर 2017 रोजी एसी लोकल ट्रेन सुरु करण्यात आली. सुरुवातीच्या पाच महिन्यांतच एसी लोकला प्रवाशांकडून खूप चांगला प्रतिसाद मिळाला. 5,00,000 हून अधिक प्रवाशांनी तेव्हा लोकल प्रवास केला. सध्या उन्हाळ्यामध्ये एसी लोकलची मागणी वाढली आणि दरमहा 3,00,000 हून अधिक प्रवाशांनी एसी लोकलचा पर्याय निवडला.**



# गीतासार



### अध्याय ५
### कर्मसंन्यासयोगः

इहैव तैर्जितः सर्गो एषां साम्ये स्थितं मनः । निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ ५-१९ ॥

ज्यांचे मन समभावात स्थिर झाले आहे, त्यांनी या जन्मीच संपूर्ण संसार जिंकला. कारण सच्चिदानंदघन परमात्मा निर्दोष आणि सम आहे. म्हणून ते सच्चिदानंदघन परमात्म्यातच स्थिर असतात. ॥ ५-१९ ॥

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् । स्थिरबुद्धिरसम्मूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थितः ॥ ५-२० ॥

जो पुरुष प्रिय वस्तु मिळाली असता आनंदित होत नाही आणि अप्रिय वस्तु प्राप्त झाली असता उद्विग्न होत नाही, तो स्थिर बुद्धी असलेला, संशयरहित ब्रह्मवेत्ता पुरुष सच्चिदानंदघन परब्रह्म परमात्म्यात ऐक्यभावाने नित्य स्थित असतो. ॥ ५-२० ॥

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् । स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ॥ ५-२१ ॥

ज्याच्या अंतःकरणाला बाहेरील विषयांची आसक्ती नसते, असा साधक आत्म्यात असलेल्या ध्यानामुळे मिळणाऱ्या सात्त्विक आनंदाला प्राप्त होतो. त्यानंतर तो सच्चिदानंदघन परब्रह्म परमात्म्याच्या ध्यानरूप योगात ऐक्यभावाने स्थिती असलेला पुरुष अक्षय आनंदाचा अनुभव घेतो. ॥ ५-२१ ॥

# जागतिक जल दिन

आज २२ मार्च, आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाटयाने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

-श्याम बसप्पा ठाणेदार,
दौंड जिल्हा पुणे

# व्योम भगतचा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये प्रथम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : व्योम मिताली केतन भगतने आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित SOF इंटरनॅशनल ऑलिम्पियाड लेव्हल-२ गणित परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाराष्ट्र-गोवा झोनमध्ये प्रथम क्रमांक पटकावत त्याने ६० पैकी ५९ गुण मिळवले, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर २५ वा क्रमांक मिळवत आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल SOF इंटरनॅशनल ऑलिम्पियाडतर्फे त्याला रोख पारितोषिक रुपये ५०००/- व महाराष्ट्र-गोवा झोनल गोल्ड मेडल देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. . व्योम सध्या पी. एन. पी. एज्युकेशन सोसायटीच्या होली चाईल्ड CBSE स्कूल, वेश्वि-अलिबाग येथे इयत्ता ५ वी मध्ये शिक्षण घेत आहे. त्याने याआधीही विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याने हिंदुस्तान टाईम्स प्रायोजित सतिश अकॅडमी वेदिक मॅथस अॅन्ड अबॅकस टीचर ट्रेनिंग संस्थेतर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत महाराष्ट्र राज्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे. या कामगिरीबद्दल संबंधित संस्थेतर्फे त्याला गोल्ड मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले आहे. कु. व्योमच्या या अपूर्व यशाबद्दल सर्व स्तरावरून अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्याकडून भविष्यात आणखी मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# उल्हास नदी बचावासाठी जागतिक जलदिनी मुंडन करून आंदोलनाला सुरवात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गेल्या 8 वर्षांपासून उल्हास नदी प्रदूषणमुक्त व्हावी, पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून मी कल्याणकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक नितीन निकम यांनी अनेक आंदोलने केलीत परंतु प्रत्येकवेळी शासन व प्रशासनाने लेखी व तोंडी आश्वासने देऊन फसवणूकच केली असल्याचा आरोप निकम यांनी केला आहे. उल्हास नदी बचावासाठी खचून न जाता लढाई हि सुरुच ठेवणार असल्याच त्यांनी सांगत शनिवारी 22 मार्च, जागतिक जलदिनी शासन व प्रशासनाचा निषेध म्हणून स्वतःचे मुंडन करून आंदोलनाला सुरुवात करणार असून कार्यालयीन वेळेत दररोज उल्हास नदीच्या दूषित पाण्यात, जलपर्णीमध्ये उभे राहून बेमुदत आंदोलन केले जाणार असल्याची माहिती नितीन निकम यांनी दिली.

# कृषी विभागाच्या सर्व योजनांसाठी सर्वसमावेशक ॲप व संकेतस्थळ विकसित करावे

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शेतीसाठी 'एआय' वर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून, कृषी विभागाच्या सर्व योजना एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी ॲप व संकेतस्थळ विकसित करावे. कृषीमधील स्टॉर्टअपला प्रोत्साहन देवून नवकल्पना विकसित करण्यासाठी कृषी विभागाने प्राधान्य द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांच्या भेटीत राज्यातील कृषी क्षेत्रात सहकार्य करण्यास ते इच्छुक असल्याचे त्यांनी असल्याचेही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे पीकविमा योजना आणि ई-पीक पाहणी यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री ॲड माणिकराव कोकाटे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना शेतीशी निगडित माहिती आणि सल्ला सहज उपलब्ध करून देण्यासाठी सर्वसमावेशक असे सिंगल विंडो इंटरफेस असलेले शेतकरी ॲप आणि संकेतस्थळ विकसित करावे. शेतकरी व कृषीकेंद्रीत ॲग्रीस्टॅक योजनांची आखणी व अंमलबजावणी करावी. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सर्व योजनांचे एकत्रिकरण करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, राज्यातील सुरू असलेल्या सर्व योजनांमध्ये जिथे सुधारणा आवश्यक आहेत त्याबाबतीत सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाने प्रमाणित बियाणांच्या उत्पादनापासून ते विक्रीपर्यंतच्या सनियंत्रणासाठी 'साथी पोर्टल विकसीत' केले आहे. महाराष्ट्रासाठी साथी पोर्टलवर सत्यतादर्शक बियाणे विक्री व वितरण होण्यासाठी विशिष्ट कार्यप्रणाली विकसीत करण्यावर भर द्यावा. शेतक-यांना ही सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावी. शेतीमध्ये कृत्रीम बुध्दीमत्तेचा वापर करून माती विश्लेषण, कीटक आणि रोगव्यवस्थापन, पुरवठा साखळी विकसित करणे व हवामानाचा अंदाज घेण्यासाठीचे तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात यावा.कृषी क्षेत्रातील संशोधनासाठी खासगी क्षेत्राकडून ज्ञान अवगत करावे. कृषी क्षेत्रात कौशल्यपूर्ण शिक्षणावर भर देण्यासाठी प्रयत्न करावा. ई पीक पाहणी ॲपमध्ये काळानुरूप बदल करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

राज्य व केंद्र शासनाच्या योजना राज्याची असलेली शेती क्षेत्रातील प्रगती, आव्हाने आणि सुधारणा याबाबत कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सादरीकरण केले.ई पीक पाहणी संदर्भात महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी सादरीकरण केले.

बैठकीला मुख्यमंत्री यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे,सचिव डॉ.श्रीकर परदेशी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के. एच. गोविंदराज,नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम कुमार गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंह उपस्थित होते.

# भिवंडी पूर्व, पश्चिम आणि ग्रामीण विभागासाठी स्वतंत्र शिधावाटप कार्यालय प्रस्तावित

## – उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी पश्चिम शिधावाटप कार्यालयाव्यतिरिक्त भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम आणि भिवंडी ग्रामीण विभागासाठी स्वतंत्र शिधावाटप कार्यालये प्रस्तावित असून, लवकरच ही कार्यालये सुरू करण्यात येतील. यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य रईस शेख यांनी या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, शिधापत्रिकेसाठी असलेल्या उत्पन्न मर्यादेच्या निकषात बदल करण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पत्र पाठवून विनंती करण्यात येईल. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्यात आले असून, सर्व रास्तभाव दुकानांमध्ये फोर-जी (४-G) तंत्रज्ञानासह आयरिस स्कॅनर असलेली ई-पॉस मशीन बसविण्यात आली आहेत. तसेच, शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली आणि आधार प्रमाणित सार्वजनिक वितरण प्रणालींचे राष्ट्रीय सूचना केंद्रच्या क्लाउडवर स्थलांतरण करण्याची प्रक्रिया डिसेंबर 2024 मध्ये सुरू करण्यात आली होती. या प्रक्रियेत काही तांत्रिक अडचणी येत होत्या. आता या अडचणी दूर करण्यात आल्या असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

राज्यातील डिसेंबर 2024 ते फेब्रुवारी 2025 या कालावधीत सरासरी 91 टक्के लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात आले, तर भिवंडी शहरातील 37 शिधावाटप कार्यालयांद्वारे 95 टक्के लाभार्थ्यांना अन्नधान्य वाटप करण्यात आले आहे. भिवंडी क्षेत्रातील शिधावाटप दुकानदारांना डिसेंबर 2024 पर्यंतचे कमिशन वितरित करण्यात आले असून, जानेवारी आणि फेब्रुवारी 2025 मधील कमिशनची प्रक्रिया वाटप करण्यात येत आहे. स्वस्त धान्य दुकानातून लाभार्थ्यांना अन्नधान्य वेळेत वाटप व्हावे यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

# नियमबाह्य भाडे आकारणाऱ्या वाहन चालकांच्या तक्रारीसाठी लवकर व्हाट्सअप क्रमांक

## – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : प्रवाशांना नियमबाह्य भाडे आकारणे, भाडे नाकारणे तसेच गैरवर्तन करणाऱ्या रिक्षा - टॅक्सी तसेच ओला -उबर चालकांच्या तक्रारीसाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये एकच व्हाट्सअप क्रमांक प्रदर्शित करण्यात येणार आहे. प्रवाशांनी आपल्या गैरसोय बाबत या क्रमांकावर प्रवाशांनी तक्रार नोंदवावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. ते वांद्रे पूर्व मतदारसंघातील बांद्रा, खार व इतर रेल्वे स्थानक परिसरात रिक्षा व टॅक्सी चालकांच्या अरेरावी संदर्भात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. यावेळी आमदार वरुण सरदेसाई व मोटार परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वांद्रे पूर्वचे आमदार वरुण सरदेसाई यांनी बांद्रा, खार अंधेरी या रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांना रिक्षा व टॅक्सी चालकांची अरेरावी सहन करावी लागते. हे चालक नियमबाह्य पद्धतीने भाडे आकारतात, गैरवर्तन करतात, तसेच अनेक प्रवाशांना इच्छित स्थळी सोडण्यास नकार देतात. या संदर्भात परिवहन विभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली. या वेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभाग व वाहतूक पोलीस यांनी मिळून एक संयुक्त पथक नेमावे ज्या भागात अशाप्रकारे प्रवाशांना रिक्षा चालकाकडून त्रास होतो तेथे वारंवार ग्रस्त घालावी. तसेच प्रादेशिक विभाग निहाय हेल्पलाईन क्रमांक प्रदर्शित न करता पूर्ण मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये एकच व्हाट्सअप क्रमांक प्रदर्शित करावा व त्याला व्यापक प्रसिद्धी द्यावी. जेणेकरून प्रवासी आपल्या तक्रारी संबंधित व्हाट्सअप क्रमांकावर करतील. तक्रार असलेल्या रिक्षा अथवा टॅक्सी चालकाला परिवहन विभागाने नोटीस पाठवणे आवश्यक असून तक्रारीची गंभीरता लक्षात घेऊन गरज पडल्यास त्याचा परवाना देखील रद्द करण्याची कारवाई करावी, असे निर्देश परिवहन विभागाला मंत्री श्री. सरनाईक यांनी दिले.

## रेसिपी
# बीटरूट ताक



1. रक्ताभिसरण सुधारते
बीटमध्ये नायट्रेट्स असतात, जे रक्तवाहिन्या पसरवण्यास मदत करतात. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते.

2. रक्ताची कमतरता दूर करते
बीट हे लोहाचा एक चांगला स्रोत आहे, जे शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढवण्यास मदत करते. बीटरूट ताक नियमितपणे प्यायल्याने अशक्तपणा बरा होतो.

3. शरीराला डिटॉक्स करा
बीटरूटमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. बीटरूट ताक प्यायल्याने शरीर स्वच्छ होते आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते.

4. वजन कमी करण्यास उपयुक्त
बीटरूट ताकमध्ये कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते, जे वजन कमी करण्यास मदत करते. हे पेय तुम्हाला बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते आणि अनावश्यक खाण्यापासून रोखते.

5. रक्तदाब नियंत्रित करा
बीटरूटमध्ये असलेले नायट्रेट्स रक्तदाब कमी करण्यास मदत करतात. बीटरूट ताक नियमितपणे प्यायल्याने उच्च रक्तदाब नियंत्रित करता येतो.

6. त्वचेसाठी फायदेशीर
बीटमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवतात. बीटरूट ताक प्यायल्याने त्वचेच्या समस्यांपासून आराम मिळतो.

7. हाडे मजबूत करते
ताक हे कॅल्शियमचा चांगला स्रोत आहे, जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. बीटरूट ताक प्यायल्याने हाडांची घनता वाढते आणि ऑस्टियोपोरोसिसचा धोका कमी होतो.

बीटरूट ताक बनवण्याची पद्धत
मध्यम आकाराचे बीट घ्या आणि ते उकळा.उकडलेले बीट सोलून त्याचे लहान तुकडे करा.ब्लेंडरमध्ये बीटचे तुकडे, एक कप दही, थोडे पाणी, काळे मीठ आणि भाजलेले जिरे घाला.सर्व साहित्य चांगले मिसळा.तयार केलेले ताक एका ग्लासमध्ये घाला आणि सर्व्ह करा.

# मोहने टिटवाळा परिसरात विनापरवाना रिक्षांचा सुळसुळाट




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : मोहने टिटवाळा परिसरात विनापरवाना रिक्षा चालकांचा सुळसुळाट वाढत असून, या प्रकारामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अर्ध्याहून अधिक रिक्षा चालकांकडे ना वाहतूक परवाना आहे, ना बॅच. त्यामुळे हे रिक्षा चालक कोणत्याही कायद्याच्या चौकटीत येत नसल्यामुळे वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन करत आहेत. यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आल्याची परिस्थिती आहे. तसेच अशा रिक्षा चालकांमुळे अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, अनेक रिक्षा चालकांकडे अधिकृत परवाना नसतानाही ते सर्रास रस्त्यावर रिक्षा चालवत आहेत. विशेष म्हणजे, काही चालक गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून, मद्यपान करून रिक्षा चालवण्याचे सर्रास प्रकारही वाढले आहेत. परिणामी, महिलांना आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींना या चालकांकडून त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. संध्याकाळी व रात्रीच्या वेळी महिला आणि महाविद्यालयीन मुलींना या चालकांचा फाजीलपणा सहन करावा लागत आहे. काही वेळा प्रवाशांना जबरदस्तीने रिक्षात बसवण्याचा प्रयत्न केला जातो, तर काही वेळा प्रवाशांसोबत गैरवर्तन केल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी रिक्षा चालवणारे चालक मद्यपान केलेले असल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. काही दिवसांपूर्वीच टिटवाळा परिसरात एकाच नंबरच्या दोन रिक्षा धावत असल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. यामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

स्थानिकांच्या मते, यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या, मात्र संबंधित विभागाकडून ठोस कारवाई झालेली नाही. दोन रिक्षांना एकच नंबर असल्याने हे वाहन कोणते खरे आणि कोणते बनावट, हे ओळखणे कठीण जात आहे. याचा गैरफायदा घेऊन काही प्रवासी फसवणुकीचाही धोका व्यक्त करत आहेत.

बनावट क्रमांकाच्या वाहनांचा गैरवापर होऊ शकतो, त्यामुळे वाहतूक पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन वाहन मालकांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

या समस्येकडे आरटीओ विभागाने अद्यापही लक्ष दिलेले नाही. अनेक वेळा स्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी यासंदर्भात तक्रारी केल्या असूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. परिणामी विनापरवाना आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे चालक बिनधास्तपणे रिक्षा चालवत असून, यामुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मुदत बाह्य स्क्रॅपरिक्षा चालवण्याचे प्रकार वाढले आहेत स्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आरटीओ विभागाने तातडीने कारवाई करून विनापरवाना रिक्षा त्वरित बंद करण्याची मागणी केली आहे. तसेच, परवाना आणि बॅचधारक चालकांनाच रिक्षा चालवण्याची परवानगी द्यावी, असेही नागरिकांचे मत आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रात्रीच्या वेळी महिलांना सुरक्षित वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्याची मागणीही जोर धरत आहे.

या प्रकाराला आळा घालण्यासाठी कठोर कारवाई झाली पाहिजे, अन्यथा प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर होईल असे सचिन साळवे या सामाजिक कार्यकर्त्याने स्पष्ट केले.

रिक्षा चालकांच्या अनेक युनियन आहेत परंतु या युनियन कडे अवैद्य बोगस रिक्षा चालकांची कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नाही युनियन चालकाची कोणत्याही प्रकारची कागदपत्राची तपासणी करत नाही युनियनचा अशा विनापरवाना रिक्षा चालविण्यावर कोणताही धबधबा राहिला नसून केवळ वर्गणी गोळा करणे आणि पावत्या फाडणे इतकेच युनियन करते की काय असा प्रश्न पडला आहे.

विनापरवाना रिक्षा चालकांचे यादी बनवणे ती आरटीओ विभागाला कळविणे त्यांच्यावर कठोर कारवाई करणे याबाबत युनियन बघायची भूमिका घेत असल्याने अशा रिक्षा चालकांचे फावते.

आरटीओ विभाग आणि पोलिस प्रशासनाने तातडीने पावले उचलून विनापरवाना रिक्षा चालकांवर कारवाई केली नाही, तर नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच बिकट होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं. २०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# उल्हासनगरच्या अर्थसंकल्पातून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार ?




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** - महानगरपालिकेच्या स्थापनेपासून पहिल्यांदा महिला आयएएस अधिकारी असणाऱ्या मनीषा आव्हाळे यांनी आयुक्त पदाचा पदभार स्विकारला असून त्यांच्या हस्ते अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. त्यासाठी लेखा विभागाची यंत्रणा कामाला लागली असून येत्या एकदोन दिवसात अर्थसंकल्प सादर करण्याची तारीख निश्चित केली जाणार आहे.

मागच्या वर्षी महानगरपालिकेचा अर्थसंकल्प हा 977 कोटी रुपयांचा होता. यावर्षी अर्थसंकल्पात वाढ होणे अपेक्षित आहे. शासनाकडून दरमहा येणाऱ्या 22 कोटी 11 लाख रुपयांच्या अनुदानातून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न मिटतो.

मुख्य उत्पन्नाचे स्तोत्र हे मालमत्ता कर विभाग, नगररचना विभाग असले तरी आणखी कोणत्या प्रकारे उत्पन्न वाढवले जाणार हे अर्थसंकल्पात समोर येणार आहे. रस्त्यां व्यतिरिक्त इतर कोणती विकासकामे हाती घेतली जाणार, शाळा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, विद्युत विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आदींसाठी किती निधीची तरतूद केली जाणार आहे. पाणी, टॅक्स, बांधकामांची, बाजार परवान्यांची फी वाढवली जाणार आहे का ही आकडेवारी देखील अर्थसंकल्पात स्पष्ट होणार आहे.

याघडीला प्रशासक राजवट असल्याने व महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती सह लोकप्रतिनिधी नसल्याने सर्वेसर्वा ह्या आयुक्त तथा प्रशासक मनीषा आव्हाळे आहेत. त्यांच्याकडून शहर विकासाचा, नागरिकांच्या हिताचा अर्थसंकल्प अपेक्षित आहे.

आयुक्त यांची एकंदरीत कार्यप्रणाली व शेवटच्या अभय योजनेची केलेली घोषणा याचा विचार करता अर्थसंकल्पातून त्यांच्याकडून अनेक आशा असून त्या निराश करणार नाहीत, अशा अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# एक एप्रिलपासून समृद्धी महामार्गावर टोल वाढ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** - नागपूर समृद्धी महामार्गावरून प्रवास करणे 1 एप्रिलपासून महागणार आहे. समृद्धी महामार्गावरील टोल दरात वाढ करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने समृद्धीवरील टोलमध्ये 19 टक्क्यांची वाढ केली आहे.

येत्या 1 एप्रिल 2025 पासून 31 मार्च 2028 पर्यंत ही टोल वाढ लागू असणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लिमिटेड या कंपनीने ही माहिती दिली आहे.

नागपूर ते मुंबई या 701 किलोमीटर अंतरापैकी नागपूर ते इगतपुरी हा 625 किलोमीटरचा मार्ग सुरू झाला आहे. येत्या महिनाभरात इगतपुरी ते उर्वरित 76 किमीचा मार्ग देखील सेवेत दाखल होणार आहे.

संपूर्ण महामार्ग खुला होण्यापूर्वीच एमएसआरडीसीने त्यांच्या टोलमध्ये मोठी वाढ केली आहे. डिसेंबर 2022 मध्ये समृद्धी महामार्गावरील टोल दर जाहीर करण्यात आले होते. त्यावेळी कार व हलक्या वाहनांसाठी प्रति किलो मीटर 1.73 रुपये टोल आकारला जात होता. मात्र या टोलमध्ये 1 एप्रिलपासून यात दरवाढ होणार आहे.

### नागपूर ते इगतपुरी किती टोल द्यावा लागणार?

- कार, हलकी वाहने - सध्याचे दर 1080 रुपये, नवीन दर 1290 रुपये
- हलकी, व्यवसायिक, मिनीबस - सध्याचे दर 1745 रुपये, नवीन दर 2075 रुपये
- बस अथवा दोन एक्सेल ट्रक- सध्याचे दर 3655 रुपये, नवीन दर 4355 रुपये
- तीन एक्सेल व्यवसायिक - सध्याचे दर 3990 रुपये, नवीन दर 4750 रुपये
- अवजड बांधकाम यंत्रसामुग्री - सध्याचे 5740 रुपये, नवीन दर 6830 रुपये
- अति अवजड वाहने - सध्याचे दर 6980 रुपये, नवीन दर 8315 रुपये

# माणेर गावात बेकायदा चाळी

## बेघर होण्याच्या भीतीने शेकडो नागरिकांचे भवितव्य अंधारात

## विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २० (वार्ताहर)** : माणेर गावात विनापरवानगी तब्बल सात चाळीत ९२ खोल्यांचे अवैध बांधकाम उभे राहिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे बेकायदा बांधकामात राहणाऱ्या शेकडो नागरिकांवर बेघर होण्याची वेळ आली आहे.

उल्हासनगर शेजारील माणेरे गाव हा भाग कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येतो. १५ सप्टेंबर २०२२ रोजी ३४ गुंठे जमिनीवर बाळकृष्ण भोईर, जयेश भोईर, मुकेश भोईर, रमेश भोईर आणि अमर घोणसोळकर यांनी संगनमत करून विनापरवानगी सात चाळी उभारल्या. या चाळींमध्ये एकूण ९२ खोल्या बांधण्यात आल्या. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता करण्यात आलेले हे बांधकाम बेकायदा असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

बेकायदा बांधकामाच्या या प्रकाराची माहिती समजताच कल्याण-डोंबिवली महापालिकेचे अधीक्षक नितीन चौधरी यांनी विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी बेकायदा बांधकामप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून, या बांधकामामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

माणेर गावातील बेकायदा ९२ खोल्यांमध्ये राहणाऱ्या शेकडो नागरिकांचे भविष्य या कारवाईमुळे अंधारात गेले आहे. अनेक कुटुंबांनी हे घरकुल त्यांच्या कष्टाच्या पैशांतून विकत घेतले होते. मात्र, आता हे बांधकाम बेकायदा ठरल्याने त्यांना बेघर होण्याची भीती सतावत आहे. बेकायदा बांधकामप्रकरणी पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. संबंधित बांधकाम पाडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे महापालिकेने नागरिकांना बेकायदा बांधकामात गुंतवणूक न करण्याचे आवाहन केले आहे.

# वैद्यकीय परिषदेच्या निवडणूकीत घोळ

## ३५ हजार डॉक्टर मतदानापासून वंचित राहणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**मुंबई** : महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) निवडणुकीत मतदार यादीतून ७० हजार डॉक्टरांना अपात्र ठरवल्यानंतर निवडणूक प्रक्रियेतील लवचिकतेअभावी जवळपास ३५ हजार डॉक्टर मतदानापासून वंचित राहणार आहेत.

त्यात राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेले १० हजार निवासी डॉक्टर व नोकरीनिमित्त परजिल्ह्यात असलेल्या जवळपास २५ हजार वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

दोन वर्षांपासून प्रशासकाअंतर्गत कामकाज सुरू असलेल्या एमएमसीची निवडणूक प्रक्रिया जाहीर झाल्यापासून वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मतदानासाठी उमेदवारी अर्ज भरण्यापासून मतदार यादीतील ७० हजार डॉक्टरांना बाद ठरविण्याच्या घटनांमुळे निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी डॉक्टरांच्या विविध संघटनांकडून करण्यात येत होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून निवडणूक अधिकाऱ्यांकडून निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

त्यातच एमएमसीच्या नियमानुसाार नोंदणी करताना दिलेल्या पत्त्याच्या ठिकाणीच जाऊन मतदान करणे बंधनकारक आहे. या नियमामुळे राज्यातील १० हजार निवासी डॉक्टरांसह जवळपास ३५ हजार डॉक्टर मतदानपासून वंचित राहणार आहेत.

**एमएमसीकडे नोंदणी करताना डॉक्टर त्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणी करतात. मात्र निवासी डॉक्टरांना पदव्युत्तर शिक्षण व रुग्णसेवेसाठी अन्य जिल्ह्यामध्ये किंवा परराज्यामध्ये जावे लागते. राज्यात जवळपास १० हजार निवासी डॉक्टर आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकीय सेवा देत असलेले २५ हजारांपेक्षा अधिक डॉक्टर शासकीय नोकरी व वैद्यकीय व्यवसायानिमित्त परजिल्ह्यात किंवा परराज्यात कार्यरत आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांतील रुग्णसेवेचा बहुतांश भार हा निवासी डॉक्टरांवर असतो. तसेच त्यांना २४ तास रुग्णसेवेसाठी सज्ज राहावे लागते. एमएमसीची निवडणूक ही ३ एप्रिल रोजी असून, या दिवशी सार्वजनिक सुट्टी नाही. त्यामुळे निवासी डॉक्टरांसह परजिल्ह्यामध्ये रुग्णसेवा देणाऱ्या ३५ हजार डॉक्टरांना मतदानाच्या दिवशी आपल्या जिल्ह्यामध्ये जाऊन मतदान करणे शक्य होणार नाही.**

# मोहने येथे गॅसचा भडका - दोघांचा होरपळून मृत्यू



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** – कल्याण पश्चिमेतील मोहने येथील एका घरात घरगुती गॅस सिलिंडरचे रेग्युलेटर बसवत असताना गॅस सुरू झाला. यावेळी स्फोट आणि आगीचा भडका उडून घरातील दोन जण होरपळले होते. गेल्या महिन्यात ही घटना घडली होती. गंभीर जखमींवर मुंबईत शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचार सुरू असताना दोन्ही जखमींचा मृत्यू झाला. त्रिशा पवन पारवे (९, रा. तांडेल इमारत, महात्मा फुले नगर, मोहने), विजय गणपत तांडेल (५६, रा. मोहने ) अशी मृत व्यक्तिंची नावे आहेत. खडकपाडा पोलीस ठाण्यात या दोन्ही मृत्यु प्रकरणाच्या नोंदी पोलिसांनी दाखल केल्या आहेत.

# तरुणाचा मृत्यूनंतर पालिकेला जाग

## खेळाच्या मैदानांवर अन्य कार्यक्रमांना बंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई**– शहरातील खेळाच्या मैदाने यापुढे फक्त खेळण्यासाठी राखीव ठेवण्याचा तसेच अन्य कुठल्याही खासगी कार्यक्रमांना न देण्याचा निर्णय वसई विरार महापालिकेने घेतला आहे. सोमवारी वसंत नगरी येथील मैदानातील खासगी मेळाव्यात वीजेचा धक्का लागून तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर पालिकेने हा निर्णय घेतला आहे. पालिकेच्या या निर्णयामुळे नागरिकांना आणि खेळाडूंना मोठा दिलासा मिळाला आहे.

वसई पूर्वेकडील वसंत नगरी या निवासी संकुलात पालिकेचे एकमेव खेळाचे मैदान आहे. या मैदानात पालिका विविध कार्यक्रमांना परवानगी देत असते. त्यामुळे खेळण्यासाठी मैदान उपलब्ध होत नाही. मुंबईतील आयोजकाला पालिकेने अवघ्या १७ हजार रुपयांच्या भाडेपोटी मैदान भाड्यावर दिले होते. तेथे ७ ते २३ मार्च या कालावधीत होली का महोत्सव नावाने मेळाव्याचे



आयोजन केले होते. तेथील सदोष वीजजोडणीमुळे एका जाळीला स्पर्श झाल्याने हर्ष सेन (२१) या तरुणाचा मृत्यू झाला होता.

या दुर्घटनेनंतर महापालिकेने खेळाची मैदाने फक्त खेळण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात बुधवारी प्रशासकीय ठरावाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. त्यात शहरातील खेळाच्या सर्व १७ मैदानांवर फक्त खेळ, क्रिडा स्पर्धा यासाठी आरक्षित असतील, त्यात कुठल्याही प्रकारच्या राजकीय, धार्मिक आणि खासगी कार्यक्रमांना परवानगी दिली जाणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे.

वसईतील धक्कादायक प्रकार, कार्बनमोनॉक्साईड वायू प्राशन करून तरुणाची आत्महत्या

आम्ही मसुदा तयार केला असून गुरूवारी आयुक्तांच्या स्वाक्षरीनंतर तो अंतिम केला जाणार आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त समीर भूमकर यांनी दिली. या निर्णयामुळे नागरिकांनी आणि स्थानिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. वसंत नगरी मैदानासाठी गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष करणाऱ्या वसंत नगरी फेडरेशनने या निर्णयानंतर आनंद व्यक्त केला आहे.

# समुद्र किनाऱ्यालगतच्या दुर्मिळ वनसंपदेची कत्तल ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अलिबाग, ता. २०** : विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींनी परिपूर्ण असलेल्या कोकण किनारपट्टीवरील पारंपरिक वनांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. कांदळवनासह किनारपट्टीवरील सदाहरित अनेक वृक्षांच्या जाती नाहीशा होत आहेत. यातीलच एक 'रावणमाड' हा वैशिष्ट्यपूर्ण वृक्ष आता दिसेनासा झाल्याचे निरीक्षण वन विभागाच्या कांदळवन कक्षातील अधिकाऱ्यांनी नोंदवले आहे. किनाऱ्यालगतच्या जमिनी विकून तिथे धनिकांनी मोठमोठे बंगले बांधले आहेत.

अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन या तालुक्यांत वैशिष्ट्यपूर्ण झाडे अनेक वर्षे तग धरून होती. दरम्यान, पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी करण्यात येणाऱ्या सुशोभीकरणात ती नाहीशी झाली आहेत.

'रावणताड' किंवा माड हा वृक्ष समुद्रकिनाऱ्याजवळच आढळतो. महाराष्ट्रातील अलिबाग आणि मुंबई, गोवा, गुजरात आणि दमण येथे हा वृक्ष आढळतो. पूर्वी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर हा वृक्ष सहज दिसून यायचा. आता वरसोली, नागाव येथे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच 'रावणमाड' शिल्लक राहिले आहेत. इतर ताडफळांप्रमाणेच हे फळ लघुशंका साफ करणारे व कृमिनाशक असते. त्याच्या बिया कुटून जखमांवर बांधून उपचार केले जातात.

चामड्याच्या वस्तू तयार करताना त्यांना काळा रंग येण्यासाठी डूम पामची पिकलेली फळे इतर काही पदार्थांबरोबर वापरतात. करवंटीपासून कड्या, माळा, तपकिरीच्या डब्या यांसारख्या वस्तू बनवतात. फळाच्या आतील कठीण भागापासून बटणे, अत्तराच्या डब्या, सुया अशा वस्तू करतात.

नारळाप्रमाणेच या वृक्षाच्या पानांपासून छप्पर, चटया, हॅट, टोपल्या, दोर, तंबू तयार करता येतात. त्याचबरोबर कागदाचा लगदा करण्याकरिता त्याची पाने वापरतात. पानातील धाग्यापासून दोर व मासेमारीची जाळी बनवतात. त्याचे लाकूड बळकट, घन व जड असते. येथील लोकजीवनात त्याला अनन्यसाधारण महत्त्व होते. समुद्रकिनाऱ्यावरील वने ही विशेषतः नाहीशी होत चालली आहेत. साधारण २० वर्षांपूर्वी येथील समुद्रकिनाऱ्यावर केतकीची वने, शिंदीची झाडे, वडाची मोठमोठी झाडे होती. ही वनसंपदा तोडून त्या ठिकाणी आता शोभेची झाडे लावण्यात आली आहेत.

**'रावण ताड' हा वृक्ष विशेष करून समुद्रकिनाऱ्यालगतच्या प्रदेशात, महाराष्ट्रात अलिबाग आणि मुंबई येथे, गोव्यामध्ये, गुजरातेत दमणमध्ये आढळतो. त्याच्या एका मूल खोडावर असलेल्या अनेक शाखांनी भरलेल्या डोक्यामुळे 'रावणताड' अशी उपाधी दिली आहे. हा वृक्ष ४० ते ६० फुट इतके उंच वाढतात. याची पाने सर्व दिशांनी ३ फुट लांबीची पंख्याच्या रचनेची असतात. पानाच्या कडा शिरांच्या बाजूने फाटलेल्या असतात. पानाचे देठ वरच्या बाजूने खोलगट असून देठाच्या खालच्या बाजूच्या किनारीवर टोकदार काटे असतात.**



**दुर्मिळ झाडांचे प्रमाण कमी होणे पर्यावरणाच्या दृष्टीने घातक आहे. काही लोकांकडून असे प्रकार घडत असतील तर त्यावर निर्बंध आणणे गरजेचे आहे. कोकणच्या किनारपट्टीवरील दुर्मिळ वनसंपदा जतन करणेही महत्त्वाचे आहे. येथील उंच आणि जुनाट झाडे नाहीशी झाल्याने त्याचे घातक परिणामही दिसू लागले आहेत. -**
**राहुल पाटील,**
**परिक्षेत्र वन अधिकारी, अलिबाग**

| जिल्ह्यातील वनक्षेत्रावर दृष्टिक्षेप | |
|---|---|
| राखीव | १,३६२.२१ चौ. किमी |
| संरक्षित | १७३.०२ चौ. किमी |
| अवर्गीकृत | १६५.२७ चौ. किमी |
| कांदळवने | १४.५४ चौ. किमी |
| एकूण क्षेत्रापैकी वनक्षेत्र- | २३.७८ टक्के |




# विजेच्या लपंडावाने उरण स्थानकातील प्रवासी हैराण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : उरण ते नेरुळ/ बेलापूर मार्गावरील उरण रेल्वे स्थानकावर मंगळवारी सायंकाळी सात वाजताच्या सुमारास जवळपास दीड ते दोन तास अंधार पसरला होता. वीज नसण्याचे प्रसंग येथे वारंवार येत असल्याने प्रवासी त्रस्त आहेत. अनेकदा प्रवाशांना आपल्या मोबाइलच्या प्रकाशाचा आधार घेत मार्गक्रमण करावे लागत आहे.

१२ जानेवारी २०२४ रोजी सुरू झालेल्या उरण ते नेरुळ/बेलापूर मार्गावरील लोकलच्या स्थानकात गेल्या १६ महिन्यांपासून अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. यात स्थानकात अंधार पसरणे, स्थानकातील साफसफाई बंद झाल्याने होणारी घाण, स्वछतागृहाची समस्या, प्रवाशांना स्थानकात वाहने उभी करण्यासाठी मोजावे लागणारे अधिकचे दर तसेच इतर अनेक समस्यांचा सामना करावा लावत आहे. त्यातच उरण स्थानकातून सकाळी पहाटे सुटणाऱ्या ६ वाजून पाच मिनिटांच्या लोकलच्या वेळी अनेकदा स्थानकातील वीज गायब असल्याने तसेच नव्याने ऐन गर्दीच्या वेळी लोकल रस्त्यात नादुरुस्त होऊन बंद होण्याच्या घटनांचीही यात भर पडली आहे. यासंदर्भात मध्य रेल्वेच्या कडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून प्रतिसाद नव्हता.

# पाणी पुनर्वापर प्रक्रिया केंद्रासाठी पनवेल मनपाची निविदा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** : महापालिका क्षेत्रातील कामोठे येथील मलनिःसारण केंद्रांमधील १५ दशलक्ष लीटर क्षमतेच्या पाण्याचे पुनर्वापर प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी महापालिकेने दुसऱ्यांदा निविदा जाहीर केली आहे. या प्रकल्पासाठी महापालिका ७३ कोटी ६१ लाख रुपये खर्च करणार आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर उपनगरातील उद्यान, शौचालय, वाहने धुण्यासाठी तसेच कारखान्यांमध्ये होऊ शकणार आहे.पनवेल महापालिका क्षेत्रात २२० दशलक्ष लीटर पाण्याची आवश्यकता असते. केंद्र सरकारने प्रत्येक शहराच्या पुरवठ्यापैकी २० टक्के पाण्याचा वापर झाल्यावर ते पाणी वाया जाण्यापेक्षा त्यावर प्रक्रिया करुन ते वापरण्यायोग्य बनविण्याचे निर्देश आहेत.

पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी केंद्र सरकारच्या या निर्देशामुळे कामोठे येथील मलनिःसारण केंद्रातून वाया जाणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी निविदा प्रक्रिया जाहीर केली आहे. यापूर्वी याबाबत विविध कंपनीकडून बोली मागविण्यात आल्या होत्या. मात्र एकाच कंपनीने यामध्ये स्वारस्य दाखविल्यामुळे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी पुन्हा निविदा प्रक्रिया राबविली आहे.

निविदा अंतिम झाल्यानंतर कंपनीच्या निवडीनंतर दीड वर्षांचा काळ प्रकल्प उभारण्यासाठी लागणार आहे. या पुनर्वापरित पाण्याचा वापर कृषी, औद्योगिक तसेच बागायतीसाठी केला जाऊ शकतो. यामुळे पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळला येईल. पनवेल महापालिका क्षेत्रात उन्हाळ्याच्या दिवसात ५० एमएलडी पाण्याची तूट भासते. पाण्याचा पुनर्वापर प्रकल्प प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्यास यातून जलदिलासा मिळू शकेल. कामोठे उपनगरातील या प्रकल्पाचे काम सुरू झाल्यानंतर पनवेल महापालिका पनवेल शहरातील ५ एमएलडी मलनिःसारण केंद्रातून वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रकल्प हाती घेणार असल्याची माहिती पालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता विलास चव्हाण यांनी सांगितले.





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# अन्न सुरक्षा,पोषण आणि उपजिविकेसाठी जंगल वाचवूया – वन मंत्री गणेश नाईक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त वन मंत्री गणेश नाईक यांनी राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. अन्न सुरक्षा, पोषण आणि उपजिविकेमध्ये जंगलांचे महत्त्व नेहमीच अधोरेखित झाले असून जंगले वाचली तरच मानवाला चांगले अन्न मिळू शकेल, त्यासाठी जंगलांचे संवर्धन व संरक्षण करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. 21 मार्च 2025 रोजी आंतराष्ट्रीय वन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने २०१२ मध्ये २१ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय वन दिन म्हणून घोषित केला. या दिनानिमित्त सर्व प्रकारच्या वनांचे महत्त्व पटवून दिले जाते. आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त, वृक्षलागवड, वन आणि झाडांशी संबंधित उपक्रम आयोजित करण्यासाठी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रयत्न करण्यास प्रोत्साहित केले जाते. जंगले केवळ अन्न आणि इंधन पुरवत नाहीत, तर ते जैवविविधता, जलस्रोत, आणि हवामान बदल यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त आपल्या पर्यावरणाची आणि जंगलांची काळजी घेण्याची प्रेरणा मिळो आणि आपण सर्वांनी मिळून जंगलाचे संरक्षण करूया, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.

## संक्षिप्त

## औषधांच्या किमतीमध्ये तफावत आढळल्यास कारवाई – मंत्री नरहरी झिरवाळ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पुणे शहरात प्रत्येक मेडिकलदुकानामध्ये एकच औषध वेगवेगळ्या कंपनीची उपलब्ध असून विविध मेडिकल दुकानात वेगवेगळ्या दराने मिळत असल्याबाबत तक्रार प्राप्त नाही. मात्र अशी तफावत आढळून आल्यास त्याची चौकशी करुन कारवाई केली जाईल, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य श्रीमती उमा खापरे यांनी यासंदर्भातील प्रश्न विचारला होता. सदस्य श्री.प्रवीण दरेकर यांनी याअनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला.

अन्न व औषध प्रशासन मंत्री श्री. झिरवाळ म्हणाले, केंद्र शासनाच्या औषध किंमत नियंत्रण आदेश, 2013 अन्वये औषधांच्या किंमती नियंत्रित केल्या जातात. एमआरपी पेक्षा अधिक किंमतीत कुणीही औषध विक्री करू शकत नाही. त्यांना मिळणाऱ्या कमिशनमधून ते दर कमी जास्त करू शकतात. खाजगी रुग्णालयात जेनेरिक औषध दुकान सुरू करण्याबाबत निश्चित विचार केला जाईल, असे सांगून डॉक्टरांना जेनेरिक किंवा इतर ब्रँडचे औषध याबाबत स्पष्ट उल्लेख करण्याच्या सूचना दिल्या जातील, असेही मंत्री श्री.झिरवाळ यांनी यावेळी सांगितले.

## केडीएमसीच्या 'फ' प्रभागातील १० गाळे सील



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार व मालमत्ता विभागाचे उपआयुक्त रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता विभागाच्या सहा.आयुक्त सविता हिले यांनी मालमत्ता विभागातील कर्मचारी पथकाच्या मदतीने डोंबिवली (पूर्व) नेहरु रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज भाजी मंडई येथील रक्कम रु. 8 लक्ष इतक्या थकबाकीपोटी 10 गाळे सील करण्याची धडक कारवाई काल केली.

## शहापूरमध्ये जागतिक ग्राहक दिन साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : ठाणे जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर तहसीलदार कार्यालय आणि ग.वि.खाडे विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग. वि.खाडे विद्यालय व जुनियर कॉलेज शहापूर येथे जागतिक ग्राहक दिन संपन्न झाला.

या जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ग्राहकांचे हक्क कर्तव्य व ग्राहकांना मिळणाऱ्या सुविधा या संदर्भात मार्गदर्शन होत असते याच हेतूने शहापूर तहसीलदार कार्यालयातील पुरवठा निरीक्षक डॉक्टर अमृता सूर्यवंशी व प्रीती जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून ग्राहकाची कर्तव्य, त्यांचे हक्क व कोणत्याही वस्तूच्या खरेदीनंतर दुकानदाराकडून किंवा ज्या व्यक्तीकडून आपण कोणतीही सेवा विकत घेत असतो त्या वस्तूची, त्या सेवेची पावती आवश्यक घ्यावी असे स्पष्ट केले. तर आपण सर्वांनी ग्राहक बनावे कोणत्याही दुककानदाराचे आपण गिऱ्हाईक बनू नये असे प्राध्यापक दिगंबर खरात यांनी म्हटले.

याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर तळपाडे, उपप्राचार्य रविंद्र खरात, प्राध्यापक दिगंबर खरात, शरद विशे, शिक्षक व शिक्षकेतर आदीजण यांनी उपस्थिती दर्शवून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक दिगंबर खरात यांनी केले.

## वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी ३० जूनपर्यंत मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (HSRP) पाटी बसविण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत वाहनमालकांना मुदत देण्यात आली होती. आजपर्यंत जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्याचे काम कमी झाले असल्याने उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या जुन्या वाहनांना ही पाटी बसविण्याकरिता ३ संस्थाची /उत्पादकांची परिवहन विभागामार्फत निवड केली आहे. तरी संबंधित वाहन मालकांनी याची नोंद घेऊन ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी असलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्यात यावी, असे आवाहन परिवहन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# शीळफाटा आणि दिव्यातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करा – राजू पाटील



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली पाठोपाठ आता शीळफाटा आणि दिव्यातील अनधिकृत बांधकामावरून विषय पुढे आला आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील शिळफाटा परिसरात बेकायदा बांधकामांचा सुळसुळाट वाढला आहे. त्यामुळे शीळफाटा आणि दिव्यातील अनधिकृत बांधकामावर करावाई करण्याची मागणी मनसे नेते राजू पाटील यांनी केली आहे.

लकी कंपाऊंड दुर्घटनेला 11 वर्षे पूर्ण झाली असली तरी यानंतर देखील अनधिकृत बांधकामांना आळा बसलेला नाही. मुंबई उच्च न्यायालयात ठाणे महानगरपालिकेने शीळ भागात 52 अनधिकृत इमारती असल्याची माहिती दिली आहे. याहून अधिक बेकायदा इमारतीचे काम सुरू असून त्याकडेही ठाणे पालिकेने लक्ष द्यावे अशी मागणी दक्ष नागरिक संघटनेचे शरद पाटील, वैशाली भोसले,आणि संतोष भोईर यांनी पत्रकार परिषद घेत पालिका प्रशासनाकडे केली होती. यानंतर महापालिकेने एका अनधिकृत इमारती करावाई केली. मात्र इतर अनधिकृत बांधकाम करावाई कधी करणार असा आता उपस्थिती केला जात असून मनसे नेते आणि आमदार राजू पाटील यांनी प्रशासनावर झोड घेतली असून पालिकेने दिव्यातील आणि शीळफाटा परिसरातील अनधिकृत बांधकामावर करावाई करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान राजू पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, मी कित्येक बांधकामाबद्दल तक्रारी केल्या आहेत, आमच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या आहेत. परंतु तेथील अधिकारी मनीष जोशी सर्वात भ्रष्ट असून दिव्यातील लोक म्हणतात एका स्लॅब पाठी 3 लाख जातात. त्यात यांचा वाटा असतो, असा आरोप पाटील यांनी करत पालिकेने अनधिकृत बांधकामावर करावाई करावी, अशी मागणीही केली आहे. दरम्यान आता महापालिका अनधिकृत बांधकावर करावाई करणार कां? हे पहावे लागेल.

# शिक्षणाला 'एआय' पूरकच ठरेल

## – माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : भारतीय शिक्षण धोरणानुसार 'एआय' तंत्रज्ञान हे शिक्षणाला पर्याय नाही तर पूरक ठरेल या दृष्टीनेच शासन विचार करीत असून महाराष्ट्राचे 'एआय' धोरण तयार होत असून याबाबत आम्ही या धोरणात सातत्याने विचार करीत आहोत, अशी माहिती माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली.

"कृत्रिम बुध्दिमत्ता अर्थात एआय संदर्भात आमदार श्रीकांत भारतीय यांनी विधानपरिषद नियम ९७ नुसार या विषयावर चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत आमदार ॲड. अनिल परब, अमित गोरखे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे आदी या चर्चेत सहभागी झाले.

या विषयाला उत्तर देताना मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले की, आज जगभर एआय तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने होत आहे. त्यामध्ये निर्माण होणाऱ्या संधी, रोजगार, उद्योग आणि तंत्रज्ञान यामध्ये आपला देश मागे पडू नये म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे एआय धोरण तयार करण्याची भूमिका घेतली. याच धोरणाला सुसंगत असे राज्याचे स्वतंत्र एआय धोरण तयार करण्यात येत असून अशा प्रकारचे धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या धोरणासाठी तज्ञांची समिती गठीत करण्यात आली असून त्यांच्या बैठका होत आहेत. या समितीसमोर शासनाने जे विषय ठेवले आहेत त्यामध्ये एआय आणि शिक्षणावर होणारे परिणाम हा विषय ठेवण्यात आला आहे. त्यामुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेला पूरकच ठरेल, असे राज्याचे एआय धोरण आम्ही तयार करीत आहोत तसेच शिक्षणासोबतच सायबर क्राईम या विषयाचा ही यामध्ये विचार करीत असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले.

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योग घटकावर कारवाई करणार

## – मंत्री पंकजा मुंडे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : औद्योगिक प्रकल्पांनी पर्यावरणीय व सुरक्षा नियमांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. जे उद्योग घटक नियमांचे उल्लंघन करतील त्या उद्योग घटकांवर कारवाई केली जाईल, असे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी सदस्य सना मलिक यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या उत्तराच्या वेळी सांगितले.

मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले की, आरएनसी प्लांटच्या संदर्भातही नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. या नियमानुसार प्लांट बंदिस्त असावा जेणेकरून धूळ प्रदूषण टाळता येईल. पाच मीटर रुंदीच्या पट्ट्यात झाडांची लागवड करणे, धूळ उडू नये म्हणून रस्ते कॉंक्रिट किंवा डांबरयुक्त करणे आणि स्प्रिंकलर्स बसवण्यासह इतर उपाययोजना बंधनकारक करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे परवानगी देण्यात आलेल्या उद्योग घटकांची नियमित तपासणी केली जाते. या तपासणीत आढळून आलेल्या त्रुटींबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाते, असेही श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

मुंबईमधील देवनार, गोवंडी, वाशी नाका, तुर्भे आणि एम/पूर्व परिसरात सहा व्यवसायिक स्वरूपाचे व तीन स्वरूपाचे असे ९ आर.एम. सी. प्लांट अस्तित्वात आहेत. या आर एम सी प्लांटला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याबाबत अटी व शर्तीनुसार संमती प्रदान केली आहे. या प्लांटबाबत आलेल्या तक्रारीची दखल घेऊन या उद्योगाची पाहणी करण्यात आली. पाहणीप्रसंगी आढळलेल्या त्रुटी संदर्भात या उद्योग घटकावर कारवाई करण्यास येत आहे .

अणुशक्ती नगर मतदारसंघातील औद्योगिक क्षेत्रात असणाऱ्या उद्योग घटकासंदर्भात सदस्य सना मलिक यांनी उपस्थित केलेले मुद्द्यांच्या अनुषंगाने चौकशी व तपासणी केली जाईल. तसेच याबाबत योग्य ती आवश्यक कार्यवाही केली जाईल, असेही पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# खवसावाडी येथील आदिवासींवर अन्याय सुरूच

## आदिवासी महिलेच्या मृत्यू प्रकरणी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना राज्य मानवी हक्क आयोगाची नोटीस





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण :पेण ताल़ुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव हद्दीतील खवसावाडी येथे रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून हर्षा कन्स्ट्रक्शन यांनी 60 लाखांचा ठेका घेऊन रस्ता पूर्ण केल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला होता. मात्र, प्रत्यक्ष पाहणीअंती या वाडीसाठी कोणताही रस्ता अस्तित्वात नाही, हे उघड झाले आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही तसेच, उंबरमाळ, केळीचीवाडी, तांबडी, खवसावाडी आणि काजूवाडी या वाड्यांसाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत 25 जानेवारी 2024 मध्ये 7.22 कोटींचा ठेका सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन, वाशी नवी मुंबई यांनी घेतला आहे. मात्र, 1 वर्ष होऊन देखील वर्क ऑर्डरची मुदत संपूनही अद्याप काम सुरू झालेले नाही असा आरोप खवसावाडी येथील ग्रामस्थांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.

यावेळी पत्रकार परिषदेला सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, ॲड.सिद्धार्थ इंगळे, ॲड.विकास शिंदे, नंदकुमार पवार, पाच वाड्यातील ग्रामस्थ प्रतिनिधी यशवंत खाकर, सुनील वाघमारे, काल्या कडू, गीता वाघमारे, पल्लवी खाकर, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे राजेश रसाळ, सचिन पाटील यांच्यासह आदिवासी महिला, पुरुष व विद्यार्थी या पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

स्वातंत्र्याच्या 76 व्यावर्षा नंतरही आदिवासी समाज विकासा पासून वंचित असल्याचे आज पुन्हा एकदा सिद्ध झाले. पेण शहरा पासून फक्त सहा ते सात किलोमीटर लांब असलेल्या व निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या खवसा आदिवासी वाडीतील डांबरी रस्ता अजूनही अपूर्णच आहे. ग्रामस्थांनी पुढे सांगितले की, गेल्या वर्षी खवसावाडी येथील आंबि राघ्या कडू आदिवासी वाडीतील एका महिलेचा रस्ता नसल्याने वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाला होता. हा प्रकार मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन असून, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे एका निष्पाप महिलेचा बळी गेला असल्याचाही आरोप केला. या प्रकरणी संतोष ठाकूर आणि ॲड.सिद्धार्थ इंगळे यांच्या माध्यमातून राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. आयोगाने रायगड जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस बजावून चार आठवड्यांत तथ्य शोध अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, आजपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही.

जिल्ह्याचा प्रथम प्रशासकीय अधिकारी म्हणून रायगड जिल्हाधिकारी यांनी यावर कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. आदिवासींच्या मूलभूत हक्कांचे उघडपणे उल्लंघन होत असताना प्रशासन केवळ डोळेझाक करत आहे. ही निष्क्रियता असह्य असून, या गंभीर प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्यासाठीच सदर पत्रकार परिषद आयोजित करण्यात आल्याचे सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी सांगितले.

**ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देऊनही रस्त्याच्या कामाला सुरुवात नाही**

**महाराष्ट्र सरकार कडून हजारो किलोमीटरच्या रस्त्यांचे जाळे विणल्याच्या वल्गना अनेक वेळा करण्यात आल्या खऱ्या मात्र सरकारचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. पेण शहरापासून निव्वळ सहा-सात किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या बोरगाव ग्रामपंचायत हद्दीतील खवसावाडी येथील रस्त्याचा २५ जानेवारी २०२४ रोजी ठेक्याचा कार्यारंभ आदेश देऊनही सदर रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याचे दिसून येत नाही. आजपर्यंत १ वर्ष २ महिने पलटले.**

**– ॲड.सिद्धार्थ इंगळे, वकील**

**मागील वर्षी ठेकेदाराने रस्त्यासाठी थोडी कटिंग व थोडा भराव टाकला होता. मात्र पावसाळ्यात तो सगळा धुपून गेला. वाडीतील कोणीही आजारी पडल्यास आणि रस्ताच नसल्याने जीवनावश्यक वस्तूंसाठी सात किलोमीटर पायपीट करुन डोक्यावर वाहतूक केली जाते.**

**–गीता वाघमारे ,महिला ग्रामस्थ खवसावाडी, पेण**

**पेण आदिवासी भागात पेसा कायदा लागू करा**

**संपूर्ण पेण तालुक्यातील आदिवासी विभागात पेसा कायदा लागू करणे गरजेचे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी मागणी केली. तसेच आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात नागरिकांनी पुढे येऊन आवाज उठवावा, जेणेकरून आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळू शकतील.**

**– संतोष ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते, पेण**

## घरकुल लाभार्थी संवाद अभियान अंमलबजावणीसाठी

# ग्रामपंचायत किसळ- पारगावने घेतली विशेष ग्रामसभा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : केंद्र सरकारने दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षण झालेल्या कुटुंबांना सरसकट घरकुल मंजूर केले, मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत किसळ- पारगाव मधील ९१ कुटुंब या यादीत समाविष्ट होते परंतु ५४ कुटुंबांना घरकुलाचा पहिला हप्ता मिळाला, वंचित राहिलेल्या कुटुंबांना व मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन व या योजनेची माहिती योग्य रीतीने पोहोचविण्यासाठी सरपंच डॉ कविता वरे यांनी पुढाकार घेऊन १९ मार्च २०२५ रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन केले, यादीत समाविष्ट सर्व कुटुंब उपस्थित होते तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी घरकुल विभागाचे अभियंता आवर्जून उपस्थित होते. सरपंच व अभियंता यांनी पात्र लाभार्थी व वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांना योग्य पद्धतीने मार्गदर्शन केले ज्या द्वारे त्यांचे योग्य समाधान झाले. या सभेला ग्रामसेवक ललिता पवार, सदस्या वैष्णवी पडवळ, मोहन पडवळ व सुनिल पडवळ उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024